# डॉ. गजाननराव दाभोलकर

— सदानंद चेंदवणकर

श्रीसाईलीला मासिकात लेखन करणाऱ्या लेखक व कवींचे पांचवे स्नेहसंमेलन शिरडी क्षेत्री २८ व २९ जानेवारीस भरले आहे व हे संमेलन नवे न्यायालयधारक श्री. क. ही. काकरेसाहेब यांच्या कारकिर्दीत होत आहे ही आनंदाची गोष्ट आहे. या संमेलनाचे अध्यक्षपदी आम्ही आजवर श्रीसाईबाबांना पाहिलेल्या, त्यांचे प्रत्यक्ष दर्शन घेतलेल्या व्यक्तींची अध्यक्षपदी योजना करीत असतो. यास अनुसरून यंदा श्रीसाईसच्चरित्रकार कै. श्री. गोविंदराव दाभोलकर यांचे सुपुत्र डॉ. गजाननराव दाभोलकर संमेलनास अध्यक्षपदी लाभत आहेत ही मोठ्या भाग्याची गोष्ट आहे. श्रीबाबांची पोथी कै. गोविंदरावांनी ज्या वांद्रे येथील 'साई निवास' वास्तूत रचली व तिची काही पाने श्रीबाबांना वाचून दाखविली त्याच वास्तूत आज डॉ. गजाननराव रहातात. त्यांचे वय आज ७६ वर्षांचे आहे. श्रीबाबा असताना ते चांगले १५ वर्षांचे होते.

श्री. गजाननरावांचा जन्म २३ सप्टेंबर १९०३ रोजी वांद्रयास झाला. त्यांच्य मातोश्रीचे नाव रुक्मिणी. त्यांचे प्रा. शिक्षण वांद्रयाला व त्यापुढील मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण गिरगावातल्या आर्यन एज्युकेशन सोसायटीच्या शाळेत झाले. १९१८ साली ते मॅट्रिक व त्यानंतर मुंबईच्या टोपीवाला नॅशनल मेडिकल कॉलेजातून ते १९२१ साली एल. सी. पी. एस ची डॉक्टरीची परीक्षा उत्तीर्ण झाले. १९२१ ते १९७१ अशी ५० वर्षे त्यांनी उत्तम प्रकारे प्रॅक्टिस केली व हजारो रुग्णाइतांची सेवासुश्रुषा केली. १९७१ त त्यांना अर्धांगवायूचा झटका आला त्यातून ते बरेचसे सावरले तरी त्यांनी आपली खाजगी वैद्यकीय प्रॅक्टिस नाईलाजाने थांबविली.

श्री. दाभोलकरांची श्रीसाईबाबांवर अगाध श्रद्धा आहे. वयाच्या १४ व्या वर्षी ते प्रथमच आपल्या वडिलांबरोबर शिरडीस श्रीबाबांचे दर्शनास गेले व वडिलांबरोबर बाबांच्या पायाजवळ बसले. बाबांना लहान मुलांच्याबद्दल खूपच ओढा. ते तिथे पायाशी बसलेले असताना 'बापू' अशी प्रेमळ हाक मारून त्यांनी त्यांना आपल्याजवळ बिलगून बसविले, गोंजारले, कुशीत घेतले तेव्हापासून त्यांचे मन जे बाबांकडे वळलेले आहे ते अगदी आजतागायत. डॉ. गजाननरावांच्या पत्नी लक्ष्मी-

बाई या पण साईभक्तच होत्या व त्यांचे पुत्र वसंत व अरविंद आणि कन्यका या पण साईभक्तच आहेत. श्री. दाभोलकरांच्या देव्हाऱ्यात कुठूनतरी अचानकपणे एकदा श्रीबाबांची फ्रेम केलेली मूर्ती अगदी भर दुपारी दृष्टांत देऊन जेवावयाच्या वेळेला आली. या मूर्तीची ते तेव्हापासून तो आजतागायत श्रद्धायुक्त अंतःकरणाने दरदिवशी पूजाअर्चा करतात. ही मूर्ती साक्षात् श्रीसाईंकडूनच आली अशी साऱ्यांची श्रद्धा आहे. या श्रीसाई मूर्तीचा उल्लेख श्रीसाई सच्चरित्रात ४० व्या अध्यायात करण्यात आलेला आहे. तसेच श्रीसाईबाबांनी दाभोलकर कुटुंबाला दिलेले रुपये त्यांच्या देव्हाऱ्यात पूजेला लावलेले आहेत. श्रीबाबांशी एवढे निकट नाते असलेले डॉ. गजाननराव आज अध्यक्ष लाभत आहे याबद्दल आनंद वाटतो. श्रीसाईकृपेने त्यांची प्रकृती चांगली आहे. ते वांद्र्याहून दादरला भाजी बाजारासाठी किंवा इतर खरेदीसाठी आगगाडीतून अगदी एकट्याने प्रवाससुद्धा या वयात करतात. जेव्हा शासनाचा संस्थानमध्ये हस्तक्षेप नव्हता तेव्हा शिर्डी संस्थानच्या कमिटीतील एक चिटणीस म्हणून सुरुवातीस ७-८ वर्षे त्यांनी कामकाज पाहिले आहे. श्रीसाईंनी त्यांना उदंड आयुरारोग्य द्यावे हीच प्रार्थना.

●

## श्री. भाऊसाहेब चेंदवणकर यांचे निधन

मुंबापुरीतील एक नामवंत पत्रकार, व प्रसिद्ध लेखक श्रीसाईलीला मराठी आवृत्तीचे कार्यकारी संपादक श्री. सदानंद चेंदवणकर यांचे वडील श्री. तुकारामजी उर्फ भाऊसाहेब यांचे गुरुवार दिनांक ४ जानेवारी १९७९ रोजी पहाटे ५ वा. सायन रुग्णालयात अचानकपणे निधन झाले. काही दिवसापूर्वी ते घरातल्या घरात पडल्याचे निमित्य झाले व त्यावर उपचारासाठी त्यांना सायन लो. टिळक हॉस्पीटलमधे ठेवण्यात आले होते. तिथे त्यांची प्रकृती सुधारत होती पण अचानक त्यांना ब्रांकोन्यूमोनिया होऊन झोपेतच त्यांचे देहावसान झाले. ते मुंबई महापालिकेतील एक सेवानिवृत्त अधिकारी होते. ते मोठे भाविक व श्रद्धाळू अंतःकरणाचे साईभक्त होते. निधनसमयी त्यांचे वय ८५ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात् पत्नी, दोन पुत्र, दोन विवाहित कन्या, नातवंडे, सूना असा परिवार आहे.

श्रीसाईनाथ मृतात्म्यास चिरशांती व सद्गती देवो ही प्रार्थना.

# – सद्‌गुरु –

सारे म्हणती गुरुविना ना मुक्ती
गुरुविना ना सुफलीत होई भक्ती ॥ १ ॥
काय करू कोठे धुंडू सुचेना मना
ध्यास एकच लागे गुरु करावा कोणा ॥ २ ॥
जिकडे पहावे तिकडे मनच रमेना
कोठे काही कोठे काही उणीव भासे मम मना ॥ ३ ॥
शांती सुखाचा मज सापडेना मेरू
किती धुंडीले किती पारखीले गुरु ॥ ४ ॥
आनंदे सुमन बोले अजि मिळाला सद्‌गुरु
साई गुरु साई तारू हाच मम मनीचा निर्धारू ॥ ५ ॥

—डॉ. सुमन खानविलकर
सीताकुंज, बॉम्बे पूना रोड,
लोणावळा

# साद

बाबा बाबा हाक मारुनी थकले माझे प्राण
का न येई साद मला आहे मी अजाण
आयुष्याची वाया गेली वर्षे ही पन्नास
नाहीं झिजवीले नाहीं शिणवीले नश्वर देहास
कळून आले मर्म आयुचे झाले रे उदास
तेव्हांपासूनी साद घालते साई मी तुम्हास
लवकर याहो दर्शन द्यावो इंदू सांगे फोडूनी टाहो
मार्ग दावा म्हणते मी भल्या भल्याना हो
तुमच्या वाचूनी वाटू लागले सर्व जग उदास
वेडे होऊनी इकडे तिकडे नेत्र शोधी तुम्हास

—डॉ. इंदू नाईक
सीताकुंज, बॉम्बे पूना रोड,
लोणावळा

# उदार माझे साईबाबा....

उदार माझे साईबाबा, बाबा साई उदार
मागावे जे त्यांच्या जवळी मजला ते देणार ॥ ध्रु० ॥

कधी न केले निराश मजला
काळोखातही प्रकाश दिधला !
पैलतिरी नेणार...उदार माझे साईबाबा ॥ १ ॥

सांभाळिती ते सारी सृष्टी
तरिही माझ्यावरती दृष्टी !
कधीं न मज भुलणार...उदार माझे साईबाबा ॥ २ ॥

जो जो त्यांना त्यांचा दिसला
क्षणात त्यांनी अपुला केला !
दूर कुणा करणार ?...उदार माझे साईबाबा ॥ ३ ॥

विस्तवांतही हात घालुनी
पोर रक्षिली किमया करुनी !
उपेक्षा माझिच का करणार ?...उदार माझे साईबाबा ॥ ४ ॥

हातामध्ये काही नसतां
हजार देती हां हां म्हणतां
दिलदार साई सरकार !...उदार माझे साईबाबा ॥ ५ ॥

आजवरी जी लाज राखिली
तोड तियेला कुठे न दिसली !
का अन्तर मज देणार ?...उदार माझे साईबाबा ॥ ६ ॥

—**श्री. श्री. तु. नाईक,** एम्. ए.
११, हेलिमा मंझील, गुप्तेपथ, विष्णूनगर,
डोंबिवली (पूर्व)

# तुझे नाम घेता....

तुझे नाम घेता, भवदुःखें हरती
आधी व्याधी साऱ्या, पळोनिया जाती !

जीवनाची वाट, अंधारली दाट
घेता साई-नाम, पार होई नीट !

प्रवास येथला, खडतर जरी
नामे तुझ्या साई, होई सुलभ परी !

ढगाळले नभ, सोसाट्याचा वारा
नाव ' साईकृपे ' गाठते किनारा !

जन्म-मृत्यूचेही, तुटाया बंधन
" साईनाम " हेची जगा वरदान !

—श्री. विजय द. हजारे, एम्. ए.
सी/६, गुंफादर्शन, फर्स्ट कार्टर रोड,
बोरीवली-पूर्व, मुं. नं. ४००,०६६

# साई उदार असे

साई उदार कसे ! ॥ पहा पहा ॥
दर्शन मात्रे पावन होती । परिसी लोह जसे ।
ज्ञानपन हे सांडुनी सगळे । जीव शरण असे ।
अभिमान धरू नको तू । दहि कर्पूर जसे ।
चरणामृत हे दाऊनी दासा । घेती आपल्या वशे ।
वंदी गुंडू साईचरणी । देती दर्शन असे ।
पहा, पहा, साई उदार कसे ?

—प्रा. गुंडेराव पटवारी,
एन्. एफ्. जे. कॉलेज, बिदर

# – श्री साईबाबांची आरती –

जय जय सत्-चित् स्वरूपा श्रीसाईनाथा
अवतरलासी शिर्डी ग्रामी जडमूढ ताराया । जय देव, जय देव०

निर्गुण जगताचा पाहून तो ऱ्हास
लीला मात्रे धरिले तू मानव देहास ॥१॥ जय देव जय देव

होऊ न देशी स्वस्वरूपाची जाणीव तू कवणा
वदवून "अल्ला मालीक" तारिसी तू भक्तजना ॥२॥ जयदेव...

आता श्रीसाई गुरुवर तूच सत्चितानंदा
जिकडे पहावे तिकडे दिससी तू नयना ॥३॥ जय देव, जय देव.

लीला अनंत केल्या जीर्ण मशिदीत
तेवविले तेलावाचून रात्रभर ज्योतीस ॥४॥ जय देव, जय देव.

क्षणात दिधली मुक्ती व्याधीग्रस्त व्याघ्रास
केला ब्रह्मजिज्ञासूच्या गर्वाचा नाश ॥५॥ जय देव, जय देव.

व्याधि टाळूनी केले कैका संपन्न
करविले मुळ्यांना श्रीगुरु घोलप दर्शन ॥६॥ जय देव, जय देव.

लीला मी पामरे श्रविल्या हो अनंत
चेतविले आपणच अखंड धुनीस मशिदीत ॥७॥ जय देव, जय देव.

भव सागर हा तरण्या नौका तव स्मरण
साई, निज दासाचे मान्य करा हे स्तवन ॥८॥ जय देव, जय देव.

—कु. शालिनी सदाशिव देशपांडे
११ रामदास कॉलनी,
जिल्हा पेठ जळगाव.

# शिरडी-वृत्त-माहे ऑक्टोबर सन १९७८

या महिन्यात श्रीसाईबाबांचा पुण्यतिथी उत्सव ६० वा आल्यामुळे बाहेर-गावचे साईभक्तांची गर्दी जास्त प्रमाणात होती. उत्सव मोठ्या थाटात साजरा झाला.

**दसरा उत्सव १ला दिवसः**—मंगळवार दि. १०-१०-७८ रोजी पहाटे ५ वा. मंदिर उघडल्यावर ५-१५ वा. काकड आरती सुरू झाली. आरती संपल्यावर ६ वा. श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक समाधिमंदिरातून गुरुस्थान मार्गे द्वारकामाईत गेली. त्या ठिकाणी साईसच्चरित अध्याय वाचनास सुरुवात झाली. समाधि मंदिरात सकाळी ६-३० वा. श्रींचे मंगलस्नान झाल्यावर नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त दुपारी ४ ते ६ पर्यंत ह. भ. प. श्रीकृष्णशास्त्री महाजन मुंबई यांचे प्रवचन झाले. सायंकाळी धुपारती झाल्यावर ७-३० ते ९ वाजेपर्यंत व ९-३० ते ११ पर्यंत मुंबई नभोवाणीचे कलाकार नाट्य कलावंत व संगीत दिग्दर्शक श्री. राम मराठे मुंबई यांचे गायन झाले. रात्रौ ९-१५ ते ११-३० पर्यंत श्रींच्या पालखीची मिरवणूक वाद्यांच्या गजरात गावातून फिरून आल्यावर शेजारती झाली.

**उत्सवाचा मुख्य दिवस :**—बुधवार दि. ११-१०-७८ रोजी पहाटे ५ वा. मंदिर उघडल्यावर ५-१५ वा. काकड आरती सुरू झाली. ६ वा. श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक द्वारकामाईतून निघून गुरुस्थानमार्गे समाधि मंदिरात आली. नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त ९ वा. भिक्षा झोळी कार्यक्रम झाला. मा. रिसीव्हर क. हि. काकरेसाहेब यांनी स्वतः झोळी घेऊन उपस्थित साईभक्तांना झोळ्या दिल्या. शिरडी गावात घरोघरी भिक्षेसाठी गेल्यावर सुवासिनींनी श्रींच्या निशाणाची पूजाआरती करून भिक्षा झोळीत गहू, तांदूळ, ज्वारी, बाजरी, फळे, नारळ, पैसे अशी भिक्षा यथाशक्ती अर्पण करून प्रसाद घेतला. सकाळी १० ते १२ पर्यंत श्री. श्रीकृष्णशास्त्री महाजन, ठाणे, यांचे श्रीसाईबाबा पुण्यतिथी आख्यान कीर्तन झाले. त्यानंतर माध्यान्ह आरती झाली व तीर्थप्रसाद वाटण्यात आला.

दुपारी १ ते ३ पर्यंत श्रींचा आराधना विधी कार्यक्रम मा. श्री. क. हि. काकरे साहेब रिसीव्हर यांचे हस्ते झाला. यजमान म्हणून त्यांनी ब्राह्मणांना धोतर, उपरणे व सुवासिनींना खण दिले. सेवेकऱ्यांना धोतरजोड व कपडा दिला. सायंकाळी ५ वा. सीमोल्लंघन मिरवणूक वाजत गाजत खंडोबाचे देवळाजवळ गेली. त्या ठिकाणी श्रींच्या

निशाणाचे व शमीचे पूजन झाल्यावर सोने लुटण्याचा कार्यक्रम झाला. त्यानंतर मा. रिसीव्हरसाहेब व उपस्थित मंडळींनी खंडोबा देवाचे दर्शन घेतले व मिरवणूक परत येतेवेळी गावातील सर्व मंदिरात जाऊन देवतांचे दर्शन घेतले.

सायंकाळी धुपारती झाल्यावर ७–३० ते ८–३० पर्यंत मुंबईतील सुप्रसिद्ध श्रीकृष्ण बँड पथक भोईवाडा परेल मुंबई, यांचा बँड वादनाचा कार्यक्रम झाला. रात्री ९-१५ ते १-२० वाजेपर्यंत श्रींच्या रथाची भव्य मिरवणूक गावातून निघाली होती. मिरवणुकीला श्रीकृष्ण बँड पथक अग्रभागी होते. सनई, चौवडा, डफ श्रीसाईनाथ माध्यमिक विद्यालय बँड पथक शिरडी, राहाता, शिरडी येथील बँड पथके मिरवणुकी बरोबर होती. साईभक्तांचे, भजन, गायन नृत्य कार्यक्रम झाले. पुण्याचे श्री. रघुनाथ बाबुराव सांडभोर यांनी श्रींच्या रथासमोर भारुड गारुड कार्यक्रमाचे वेळी नकलांचा कार्यक्रम सादर केला होता. कृष्णाची भूमिका कु. महेंद्र उर्फ राजू रमेशचंद्र छाजेड, गवळणी कु. हर्षा र. छाजेड, व कु. साधना भा. बाकलीवाल, राधिका मनोहर व पेंद्या श्री. रघुनाथ सांडभोर यांनी करमणुकीचा कार्यक्रम उत्तम प्रकारे केला. लोकल ग्रामस्थानी भारुड गारुड कार्यक्रम केले. मिरवणूक रात्री १-२० ला मंदिरात आली व भक्तमंडळीनी कलाकारांचे गायनाचे कार्यक्रमात भाग घेतला. रात्रभर कलाकारांच्या हजेऱ्या झाल्या. श्रींच्या दर्शनासाठी मंदिर रात्रभर खुले होते.

**दसरा उत्सव तिसरा दिवस :—** गुरुवार दि. १२–१०–७८ रोजी पहाटे ६ वा. श्रींचे मंगलस्नान झाले. गुरुस्थानठिकाणी सकाळी ७-३० ते ८-३० पर्यंत रुद्राभिषेक झाला. नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त दुपारी ४ ते ६ पर्यंत ह. भ. प. श्री. लक्ष्मणबुवा वाघचौरे शिरडी यांचे कीर्तन झाले. रात्रौ ७-३० ते ९ पर्यंत श्री. प्रभाकर साने वसई यांचे गायन झाले. रात्रौ ९-१५ ते १० पर्यंत श्रींच्या पालखीचा गुरुवारचा कार्यक्रम झाला. त्यानंतर शेजारती झाली.

**दसरा उत्सव चौथा दिवस :—** शुक्रवार दि. १३–१०–७८ रोजी पहाटे ५ वा. मंदिर उघडले. ५-१५ वा. काकड आरती झाली. ६ वा. श्रींचे मंगलस्नान झाले. नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त सकाळी १० ते १२ वाजेपर्यंत संस्थान गवई काव्यतीर्थ श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांचे काला कीर्तन झाले. दही हंडी कार्यक्रम झाल्यावर माध्यान्ह आरती झाली व तीर्थ प्रसाद वाटण्यात आला. दुपारी ४ ते ६ पर्यंत श्री. कन्याकुमारी उपासनी महाराज मठ साकोरी यांचे भजन झाले. रात्री ७-३० ते १० वाजेपर्यंत श्री. आनंद संगीत विद्यालय कोपरगाव यांचे गायनाचा कार्यक्रम झाला. १० ते १०-३० शेजारती झाल्यावर मंदिर परिसरात, आरती थिएटर्स

कुमार सेन गुप्ते कृत मुंबई यांचा "शिरडीचे साईबाबा" या नाटकाचा प्रयोग झाला. ६० व्या श्रीसाईबाबांच्या पुण्यतिथी उत्सवानिमित्त या नाटकाचा कार्यक्रम संस्थानने आयोजित केला होता. नाटकाचा प्रयोग अत्यंत कलात्मकतेने सादर करून साईभक्तांचे मनोरंजन केल्यामुळे, संस्थानचे कोर्ट रिसिव्हर मा. श्री. क. हि. काकरे साहेब यांनी कलाकारांना शाल व श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार केला. त्यानंतर उत्सव समाप्त झाला.

**कोजागिरी पौर्णिमा :—** रात्री ११ ते १२ श्रीसाईबाबांची पूजा व चंद्रपूजा कार्यक्रम मा. रिसीव्हरसाहेब यांचे हस्ते झाला. उपस्थित भक्त मंडळीना दूध, पोहे वगैरे प्रसाद वाटण्यात आला. डॉ. के. बी. गव्हाणकर मुंबई यांचे प्रवचन झाले. नंतर त्यांच्या सहकाऱ्यांनी भजन, गायन, नकला, नृत्य, वादन वगैरे करमणुकीचे कार्यक्रम करून रात्रभर जागर केला.

काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली त्यांची नावे खालीलप्रमाणे :—

**कीर्तन :—** १) संस्थान गवई श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांची कीर्तने नेहमीप्रमाणे झाली.
२) ह. भ. प. अंबादास वि. मुळे देवाची आळंदी यांचे कीर्तन झाले
३) ह. भ. प. लक्ष्मणबुवा वाघचौरे यांचे यांचे कीर्तन. (शिरडी)
४) ह. भ. प. विनायक त्र्यं. भागवत यांचे कीर्तन. (ग्वालियर)

**प्रवचन :—** १) ह. भ. प. मदनलाल खलीफा, हैद्राबाद
२) ह. भ. प. कुलकर्णी महाराज, पंढरपूर
३) ह. भ. प. वसंतराव गाडे गुरुजी, पवनार आश्रम नागपूर

**भजन, गायन, वादन वगैरे :—** १) श्री नवरात्र उत्सव मंडळ, शिरडी. २) श्री. नन्हेंबाबू कुवर, माणिकनगर बिदर. ३) श्री. सतीश श. तागडे, इन्दोर. ४) श्री. श्रीराम वि. सातर्डेकर, मुंबई. ५) श्री. भोलानाथ रा. समेळ, मुंबई. ६) कु. जयश्री तरडे, हुशंगाबाद. ७) श्री. दामूअण्णा म. दळवी, श्रीरामपूर. ८) श्री. शिवराम बिडवे, संगमनेर. ९) श्री. सीताराम कि. खोसे, संगमनेर. १०) श्री. बाबूराव व. बिडवे, संगमनेर. ११) श्री. श्यामसुंदर भेडा, संगमनेर. १२) श्री. विठ्ठलराव वि. मांजरेकर, शिरडी. १३) श्री. पुरुषोत्तम वि. बावकर, मुंबई. १४) श्री. सुधीर के. रानडे, मुंबई. १५) सौ. शकुंतला मो. जोशी, नाशिक. १६) सौ. शरयु सा. मराठे, शिरडी. १७) श्री. साईरमणानंद बाबाजी, मद्रास. १८) श्री. जयंत न. खोत, ग्वाल्हेर. १९) श्रीकृष्ण शंकरराव, ग्वालियर.

२०) श्री. रघुनाथ बा. सांडभोर, पुणे. २१) कु. राजू र. छाजेड, शिरडी. २२) कु. हर्षला र. छाजेड, शिरडी. २३) कु. साधना भा. बाकलीवाल, शिरडी. २४) श्री. मनोहर गो. भिलाई, पुणे. २५) श्री. दिगंबरराव भातोडे, राहाता. २६) श्री. शशिकांत द. नागरे, राहाता. २७) श्री. रामचंद्र द. वाडेकर, शिरडी. २८) श्री. ज्ञानेश्वर रा. वैद्य, शिरडी. २९) श्री. नामदेव ना. भोईर, कुलाबा. ३०) श्री. शंकर वि. जोशी, नाशिक. ३१) सौ. कमल र. सांडभोर, पुणे. ३२) श्री. रेणूबाबू, हैद्राबाद. ३३) श्री. नारायण जे. बी., हैद्राबाद. ३४) सौ. सविता सु. गिजरे, शिरडी. ३५) सौ. नीला वि. प्रभू, मुंबई. ३६) श्री. हरक च. रूणवाल, शिरूर. ३७) श्री. हेमंत पाटील, मुंबई. ३८) श्री. चंद्रशेखर ज. गाडगीळ, पुणे. ३९) श्री. गंगाधरपंत जाधव, पुणे. ४०) श्री. नारायण आ. क्षीरसागर, औरंगाबाद. ४१) श्री. सखाराम रा. सालकर, कोपरगाव. ४२) श्री. केदार शर्मा, धांदलगाव. ४३) श्री. ज्ञानोबा ता. वाडेकर, शिरडी. ४४) श्री. सदाशिव गो. हडकर, मुंबई. ४५) श्री. मनमोहन पां. मसुरकर, मुंबई. ४६) श्रीकृष्ण बॅण्ड पथक, परेल, मुंबई. ४७) श्री. रघुनाथ नागरे, शिरडी. ४८) श्री. सुधाकरपंत डहाळे, शिर्डी. ४९) श्री. कुमारसेन गुसे, शिरडीचे साईबाबा नाटक, मुंबई. ५०) श्री. सदाशिव म्हा. आरोरे, कोपरगाव. ५१) सौ. अलका रिसवाडकर, मुंबई. ५२) डॉ. के. भ. गव्हाणकर व पार्टी, कोजागिरी पौर्णिमा कलाकारांची नावे. ५३) शाहीर रोहिदास मसुरकर, मुंबई. ५४) श्री. सुकदेव कांबळे ५५) श्री. दिलीप मोरे ५६) श्री. मनोहर गडेकर ५७) श्री. सदानंद करदेकर ५८) श्री. एकनाथ धनावडे ५९) श्री. दत्ता मोरे ६०) श्री. नामदेव केणी ६१) श्री. अंबाजी नागेश ६२) श्री. विनायक लाड ६३) श्री. सुधाकर पाटील ६४) श्री. अनंत तावडे ६५) श्री. प्रमोद याज्ञिक ६६) श्री. अनंत पांचाळ ६७) अशोक सावंत ६८) श्री. मधुकर घोडविंदे ६९) सौ. यमुना भानूशाली ७०) श्री. राजन ७१) श्री. बाळा तळगावकर ७२) श्री. रामचंद्र विभाटे ७३) श्री. दिपक वाडेकर ७४) श्री. रविंद्र पांचाळ ७५) श्री. नंदकुमार कदम ७६) श्री. कविश्वर ७७) श्री. चंद्रकांत सामंत ७८) श्री. विजयबाबा ७९) श्री. हुसनखान ८०) श्री. अशोक बा. राजुरकर, इन्दोर. ८१) श्री. एकनाथ ग. मोरकर, ग्वाल्हेर. ८२) श्रीमती अलका बागळे, मुंबई. ८३) श्री. पी. बी. राव व पार्टी, मद्रास. ८४) श्री. हरी के. काळे, मुंबई व सुवर्ण प्रभात बॅण्ड पथक, वरळी, मुंबई. ८५) श्री. मदनलाल खलीफा, हैद्राबाद ८६) श्री. शरद पुरुषोत्तम देवास ८७) श्री. सत्यवान गो. पाऊसकर, मुंबई. ८८) श्री. जाधव गुरुजी, शिरडी. ८९) श्री. आर. एम. देवचक्के, अहमदनगर जिल्हा बॅण्ड पथक होमगार्ड. ९०) श्री. राजेन्द्र वि. भागवत, ग्वाल्हेर. ९१) श्री. एस.

नरसिंगराव, मुंबई. १२) श्री. टी. नरेश, मुंबई. १३) श्री. भगवानबुवा पवार, मुंबई. १४) श्री. अनुराग मुंबई. १५) श्री. के. टी. टिक्कू १६) श्री. विठ्ठलदास करसनदास १७) श्री. भावरत्न सरगम मुंबई.

लक्ष्मीपूजनः– दिवाळीला श्रीसाईबाबांचा लक्ष्मीपूजन कार्यक्रम मा. श्री. क. हि. काकरेसाहेब रिसिव्हर यांचे हस्ते झाला.

**माननीयांच्या भेटीः—**

१) मा. श्री. श्रीपतराव बोंद्रे, कृषि राज्यमंत्री, महाराष्ट्र.
२) मा. श्री. बबनराव ढाकणे, सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री, महाराष्ट्र.
३) मा. श्री. डी. वाय. पाटील, जनरल सेक्रेटरी महाराष्ट्र प्रदेश जनता पार्टी
४) मा. श्री. जितकर, जिल्हाधिकारी, अहमदनगर.
५) मा. श्री. चौबे, डायरेक्टर ऑफ टुरिझम, मुंबई.
६) मा. श्री. छेदिलाल गुप्ता, वन, दारूबंदी आणि उत्पादन शुल्कमंत्री, महाराष्ट्र
७) मा. श्री. रमाशंकर कौशिक, अबकारी व कामगार मंत्री ( यू. पी. )
८) मा. श्री. यार्दी, असिस्टंट कमिशनर, महाराष्ट्र.
९) मा. श्री. सुब्रह्मण्यम, आय. जी. कर्नाटक राज्य.
१०) मा. श्री. बी. एस. गोवेकर, जस्टीस, मुंबई.
११) मा. श्री. पुरी, जनरल मॅनेजर, स्टेट बँक ऑफ इंडिया.
१२) मा. श्री. दैठणकर, जिल्हाधिकारी, धुळे.

हवापाणीः– शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही.

# शिरडी-वृत्त, माहे नोव्हेंबर सन १९७८

या महिन्यात श्रीसाईबाबांचे दर्शनासाठी साईभक्तांची गर्दी फारच होती. काही कलाकारांनी श्रींचे पुढे हजेरी दिली ती खालील प्रमाणे:—

**कीर्तन**:— १) संस्थान गवई काव्यतीर्थ श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांची कीर्तने नेहमीप्रमाणे एकादशी व महत्त्वाचे दिवशी झाली.

**प्रवचन**:— १) श्री. लक्ष्मणबुवा वाघचौरे शिरडी व
२) श्री. जगन्नाथबुवा वाघचौरे यांची प्रवचने झाली.

**गायन, वादन, भजन** वगैरे:—१) श्री. मोहन वि. शिरोडकर मुंबई. २) कु. वंदना शिरोडकर मुंबई. ३) कु. विश्वनाथ शिरोडकर मुंबई. ४) श्री. वसंतराव का. काडणेकर मुंबई. ५) श्री. गोपीनाथ ना. वायके, मुंबई. ६) श्री. अनिलकुमार बा. पगारे मुंबई. ७) श्री. शिवाजी तु. धुमाळ शिरडी. ८) श्री. रवी गो. गांधी मुंबई. ९) सौ. वंदना व. तांदूळवाडकर, अकोला अ. नगर. १०) न्यू. बालाजी भजनी मंडळ, अंदरसूल नासिक. ११) ह. भ. प. नारायण महाराज व भजन मंडळी, कुर्ला मुंबई. १२) श्री गुरुकृपा भजनी मंडळ, वसई ठाणे. १३) श्री. वसंत द. वाळुंजकर ठाणे. १४) श्री. महादेव वि. खवणेकर शिवडी मुंबई. १५) श्री. अप्पासाहेब सामंत मुंबई. १६) श्री. शशिकांत शं. पुसाळकर मुंबई. १७) श्री. बाबुराव वि. बांदिवडेकर मुंबई. १८) श्री. बाळकृष्ण जंजाळे पुणे. १९) सौ. लीलावती रायवडगकर पुणे. २०) श्री. व्यंकटेश ह. वळसंगकर परभणी. २१) श्री. खंडेराव रा. जाम वलसाड. २२) श्री. रमेशप्रसाद श्रीवास्तव, उदेपूर, राजस्थान. २३) श्री. सरदारसिंग अरोरा चेंबूर मुंबई.

**तुळशी विवाह**:— श्रींचे द्वारकामाईत सालाबादप्रमाणे तुळशीविवाह कार्यक्रम झाला. साईभक्त व संस्थान कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांना प्रसाद वाटण्यात आला. मुलांनी फटाके वाजवून आनंद व्यक्त केला.

**कार्तिक एकादशी**:— महा एकादशीनिमित्त सालाबादप्रमाणे रात्री कीर्तन, श्रींचे पालखीची गावातून मिरवणूक, गारुड, भारुड इत्यादि कार्यक्रम झाले.

**माननीयांच्या भेटी**:—

१) मा. श्री. रा. सु. गवई, सभापती विधानपरिषद महाराष्ट्र मुंबई.
२) मा. श्री. रामरावजी आदिक, माजी मंत्री महाराष्ट्र मुंबई.

३) मा. श्री. बब्नराव ढाकणे, राज्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम खाते महाराष्ट्र, मुंबई.
४) मा. श्री. ए. बी. मुथा, जिल्हाधिकारी, औरंगाबाद.
५) मा. श्री. जितकर, जिल्हाधिकारी, अ. नगर.
६) मा. श्री. मोहिते, डी. एस. पी., अ. नगर.
७) मा. श्री. शंकररावजी काळे, राज्यमंत्री, सहकार व शिक्षण खाते, महाराष्ट्र मुंबई.
८) मा. श्री. एम. ईश्वरराज, माथूर ॲडिशनल डायरेक्टर, पब्लीक रिलेशन, महाराष्ट्र राज्य.

हवापाणी :– शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही.

## श्रीसाई मंदिराचे बांधकाम

नम्र आवाहन

विद्यानगर जिल्हा नेलोर (आंध्र प्रदेश) येथे श्रीसाईबाबा दगडी मंदिराचे बांधकाम चालू आहे. हे मंदिर ५२×२१×१३ या क्षेत्रफळाचे आहे. १३ फूट भिंतीचे कामकाज पूर्ण झाले आहे. याला ३५००० रु. खर्च आला. आता आम्हाला आणखीन बांधकाम पूर्ण करण्यास ३०००० रु. ची गरज आहे. तेव्हा सर्व साईभक्तांना नम्र प्रार्थना की त्यांनी या मंदिराच्या शिल्लक राहिलेल्या बांधकामासाठी सढळ हाताने या उदात्त व कायम स्वरूपाच्या कार्यासाठी त्वरीत आर्थिक मदत देणगीच्या रुपाने पुढील पत्त्यावर पाठवावी. आपल्या देणगीची रीतसर पोचपावती पाठविण्यात येईल. देणगी मनी-ऑर्डरने खजिनदार शिरडी साई कल्चरल मिशन (रजिस्टर्ड), विद्यानगर पिन क्रमांक ५२४४१३, जिल्हा नेलोर, (आंध्र प्रदेश) या पत्त्यावर पाठवावी किंवा मिशन अकाऊंट क्रमांक-सी-ॲण्ड आय-९ स्टेट बँक ऑफ इंडिया, विद्यानगर नेलोर (ए. पी.) येथे थेट भरावी.

# शिरडी-वृत्त माहे डिसेंबर सन १९७८

या महिन्यात साईभक्तांची गर्दी जास्त प्रमाणात होती. वर्षअखेर सुट्या, शाळांच्या सहली, नाताळसण यामुळे यात्रेकरू व भक्त मंडळी यांची साईदर्शनासाठी फार गर्दी होती. काही कलाकारांनी श्रींपुढे आपल्या कलेची हजेरी दिली ती खालीलप्रमाणे.

**कीर्तन :-** १) श्री. ग. वि. जोशी शास्त्री संस्थान गवई यांची कीर्तने नेहमीप्रमाणे झाली. २) श्री. रामराव गो. डुकरेमहाराज बुलढाणा कीर्तन. ३) श्रीमती जानकीबाई इंगळे कीर्तन. ४) ह. भ. प. कृष्णाबाई येवलेकर कीर्तन. ५) श्री. लक्ष्मणबुवा वाघचौरे.

**प्रवचन :-** ह. भ. प. विठ्ठलराव के. कुळकर्णी, संगमनेर यांचे प्रवचन.

**भजन, गायन, वादन :-** १) कु. स्वाती करंदीकर कोपरगाव. २) मंगला वहडणे कोपरगाव. ३) श्री. आनंदराव के. आढाव कोपरगाव. ४) श्री. कमलाकर शं. कुलकर्णी फलटण. ५) श्री. अमीचंद छामजी मुंबई. ६) श्री. अनंत ध. गायकवाड ठाणे. ७) श्री. शिवाजी तु. धुमाळ शिरडी ८) श्री. ज्ञानेश्वर रा. वैद्य शिरडी. ९) श्रीसाईकृपा संगीत विद्यालय गोरेगाव मुंबई १०) श्री. विपुल अ. कुलेंकर मुंबई. ११) श्री. कृष्णमूर्ती बंगलोर १२) सौ. प्रभाबाई प. बेलवलकर नागपूर. १३) कु. विमलताई भा. शिर्के जळगाव. १४) श्री. जयवंत कुळकर्णी मुंबई. १५) श्री. रुपकुमार राठोड मुंबई. १६) कु. कैलास व. वोरा मुंबई. १७) श्री. सुधीर केसकर मुंबई १८) श्री. अर्जुन दळवी मुंबई. १९) श्री. विरुपाक्षेश्वर भजनी मंडळी ठाणे. २०) श्री. प्रकाश म. नेरकर नित्यानंद भजन मंडळ, वांद्रे मुंबई. २१) श्री. नागेशराव खळीकर ठाणे. २२) स्वामी संजयानंद. २३) सौ. मीराबाई संजय, बद्रीनाथ हिमालय. २४) श्रीमती वेदावती एम. गोपाळ हैद्राबाद. २५) श्री. रामचंद्र द. वाडेकर कोपरगाव. २६) श्री. मुरलीधर भा. लोंढे माळेवाडी. २७) कु. विजया राधाकृष्ण मद्रास. २८) सौ. सीतालक्ष्मी अय्यर पुणे. यांचे कार्यक्रम झाले.

**दत्तजयंती कार्यक्रम :—** गुरुवार व दत्तजयंती एकाच दिवशी असल्यामुळे मंदिरात फारच गर्दी झाली होती. सायंकाळी दत्तजन्म कीर्तन झाल्यावर रात्री ९-१५ ते ११-५० पर्यंत श्रींच्या रथाची मिरवणूक शिर्डी गावातून आली. त्यात असंख्य साई भक्तांनी मोठ्या उत्साहाने भाग घेतला. मिरवणूक मंदिरात आल्यानंतर शेजारती झाली.

**माननीयांच्या भेटी :—**

१) मा. श्री. यशवंतराव मेघावाले, वनमंत्री मध्यप्रदेश भोपाळ.
२) मा. श्री. डी. एन. चौधरी, डे. सेक्रेटरी, महाराष्ट्र, मुंबई
३) मा. श्री. वालावलकर, असि. कमिशनर, महाराष्ट्र, मुंबई.
४) मा. श्री. राणे, चिफ इंजिनिअर, महाराष्ट्र.
५) मा. श्री. के. बी. जितकर, IAS जिल्हाधिकारी, अ. नगर.
६) मा. श्री. ओमप्रकाश गणहोत्रा, IAS अ. नगर.
७) मा. श्री. डी. डी. साठे, ICS सेवानिवृत्त मुख्य सचिव महाराष्ट्र.
८) मा. श्री. एम. वाय. गुप्ते, इन्कमटॅक्स कमिशनर महाराष्ट्र.
९) मा. श्री. नय्यर, सेटलमेंट कमिशनर महाराष्ट्र.
१०) मा. श्री. भारद्वाज डायरेक्टर ऑफ अकाऊन्टस, राजस्थान.
११) मा. श्री. पु. स. पाळंदे, IAS कमिशनर, पुणे.
१२) मा. जस्टीस श्री. व्ही. बाळकृष्ण येराडी, न्यायाधीश हायकोर्ट, केरळा कोचीन.
१३) मा. श्री. पी. एम. कैलासन, न्यायाधीश सुप्रिमकोर्ट, दिल्ली.
१४) मा. जस्टीस श्री. एम. राम जोईस, न्यायाधीश हायकोर्ट, कर्नाटक बंगलोर.
१५) मा. श्री. रामराव, IAS जिल्हाधिकारी, जळगाव.
१६) मा. श्री. आर बी. वधाईवाला, ICS सेवानिवृत्त.
१७) मा. श्री. जोशी, IAS जिल्हाधिकारी औरंगाबाद.
१८) मा. के. पी. नायर, IAS जॉइंट सेक्रेटरी, आंध्र प्रदेश, हैद्राबाद.

**हवापाणी :—**शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही.

## 'साई गीतायन' कर्ते श्री. चकोर आजगांवकरांचा सत्कार

'श्रीसाईलीला'चे एक प्रतिभाशाली लेखक, 'साईगीतायन'चे जनक श्री. चकोर आजगावकर एम. ए. यांचा श्रीदत्तावतारी श्रीआद्य माणिक प्रभूंच्या माणिकनगर (हुमणाबाद) संस्थानतर्फे गेल्या दत्तजयंतीस १४-१२-७८ रोजी भव्य सत्कार करण्यात आला. हा सत्कार त्यांनी केलेल्या दत्तसाधना व दत्तवाङ्मयसेवा याबद्दल करण्यात आला. सदरहू सत्कार प्रसंगी त्यांना रौप्य-करंडक, प्रभूंची चांदीची प्रतिमा आणि 'रत्न भूषण' हे सन्मानपत्र गौरवपूर्वक बहाल करण्यात आले.